# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांक: 2अ/एडीएम/2013/877

दिनांक: 12 AUG 2013

प्रति,

प्रेसिडेंट,

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ स्कुल्स ऑफ आर्किटेक्चर (मासा)

नोंदणीकृत कार्यालय : रिझवी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,

ऑफ कार्टर रोड, बांद्रा (पश्चिम)

मुंबई ४०० ०५०

विषय : प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश अपलोड करण्याबाबत.....

संदर्भ : संचालनालयाची अधिसूचना क्रमांक २अ/एडीएम/२०१३/८२३, दिनांक ६.८.२०१३

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशाचा कट ऑफ डेट आणि अपलोडिंग डेट याबाबतची संदर्भाधीन अधिसूचना१प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार आपल्या असोसिएशनमार्फत प्रथम वर्ष वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाचे प्रवेश केलेले आहेत अशा संस्थांनाही सदर कट ऑफ डेट आणि अपलोडिंग डेट नुसार प्रवेश /अपलोड करणे बंधनकारक आहे असे आपल्या स्तरावरून त्वरीत कळविण्यात यावे. तसेच एम आर्च पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची कट ऑफ डेट दिनांक १४.८.२०१३ आणि अपलोडिंग डेट दिनांक १६.८.२०१३ अशी आहे असे आपणास कळविण्यात येत आहे.

या अनुषंगाने आपणास पुढे असेही कळविण्यात येते की, विहीत कट ऑफ डेटनंतर प्रवेश केल्यास तसेच प्रवेश अपलोड केल्यास शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम २००८/(५२/०८) तांशि-१, दिनांक २९.३.२००८ नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावे. वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची माहिती संचालनलायाच्या संकेतस्थळावर अपलोड न केल्यामुळे या अभ्यासक्रमासाठीची आवश्यक सांख्यिकी माहिती व इतर माहिती आवश्यकतेनुसार वेळोवेळी उपलब्ध होत नाही. परिणामी या अभ्यासक्रमासाठी घ्यावयाच्या धोरणात्मक निर्णयामध्ये अडचणी निर्माण होतात या बाबीचा गांभीर्याने विचार करता आपल्या असोसिएशनमार्फत प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व संस्थांना त्यांच्या प्रवेशाची माहिती उपरोक्त मुदतीत संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या सूचना तातडीने देण्यात याव्यात.

(डॉ.सुभाष महाजन)

---

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

क्र. तंशिस/प्राकाना/शैवि/२०१३/2767

दि. 14 AUG 2013

प्रति,

प्राचार्य,

सर्व वास्तुशास्त्र पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,

नागपूर विभाग

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर